**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः अब्दुल समद दाउद दांडेकर,

वयः ५२ वर्षे, व्यवसायः पेंटींग,

राहणारः रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१.	दि.२६.११.२०१९ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही नाही व त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२.	हे म्हणणे खरे नाही की, दि.२६.११.२०१९ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच रियाज करजीकर याला पंचनामा करण्याकरीता रोहा शहरातील गवळवाडी भागामध्ये सज्ञाद मोर्बेकर याचे गुरांचे बेडयाजवळ बोलाविले होते, आरोपींनी त्या ठिकाणावरुन दोन गाय व दोन कालवड त्यांचे गाडीमध्ये टाकल्या होत्या, सदर घटनास्थळावर पोलिसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला, त्यावर मी वाचून सही केली.

०३.	हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो, त्यामुळे मी

त्यांना वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.एम.वर्मा यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. आरोपींनी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्यास नकार दिला.**

फेरतपास नाही.		श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/–

स्थळ : रोहा.		(एस. एस. महाले)

दि.१२.१२.२०२३		प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.

(टिप – डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामुळे प्रस्तूतचा दस्त डिजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)